# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१५/२०२२** **दिनांक ०५.१२.२०२२**
**स्थळ- जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ-दुपारी१.३० वाजता**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व १००/२०२१ (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दि.०५/१२/२०२२ रोजी दुपारी ०१.३० वा. जिल्हा न्यायालय,अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.१०७५०/२०२२, जिल्हा न्यायालय,अहमदनगर दिनांक ०४.१२.२०२२ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा सोमवार दि.०५/१२/२०२२ रोजी दुपारी १.३० वा. जिल्हा न्यायालय,अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे वतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी सभेकरीता उपस्थित होते.

**या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.**

- **मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
  **प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
  **अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.डॉ.राजेंद्र भोसले, भा.प्र.से.**
  **जिल्हाधिकारी अहमदनगर तथा**
  **सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

- **मा.श्री.राहूल जाधव,**
  **उप मुख्य कार्यकारी अधिकारी,**
  **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

**विषय नं.१** **शेवटच्या बैठकीच्या ठरावांची पुष्टी आणि अनुपालन.(दि.२१.११.२०२२ व दि.२२.११.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.)**

**निर्णय क्र.६५०/१** **दि.२१.११.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**निर्णय क्र.५९९** **कायम करण्यात आला.**

**श्री.के.व्ही.रमणी यांचे सोबत फोनवर स्पिकर ऑन करुन बोलुन माहिती घेतली. त्यांनी सदर दुरुस्तीचे काम आणि अंदाजपत्रक तयार करण्याचे काम करण्यास देखील असमर्थता दर्शविली. त्यांनी सुचना दिल्या की, एकदा कोव्हिडचे कालावधीत पुर्वीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कालावधीत काही दुरुस्तीचे काम झालेबाबत त्यांना कळविण्यात आले. त्याची माहिती घ्यावी. आणि दोन वर्षातच पुन्हा दुरुस्तीची खरोखर गरज आहे काय याचा विचार करावा.**

**ते स्वत: आता प्रकृती बरी नसल्यामुळे येऊ शकत नाही. त्यामुळे तत्कालीन संस्थानचे अभियंता श्री.आहेर आणि आर्किटेक्ट निकम यांचेशी सल्ला मसलत करुन निर्णय घ्यावा.**

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपरोक्त गोष्टी तपासून त्यांचा अभिप्राय घ्यावा आणि पीडब्ल्युडी कडून स्वतंत्र अभिप्राय घ्यावा व सादर करावा.**

**निर्णय क्र.६००/१ व निर्णय क्र.६००/२ कायम करण्यात आला.**

**निर्णय क्र.६००/३** **दि.३१.१.२०२३ पर्यंत रक्कम देणे असल्याने या प्रकरणी पाठपुरावा करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देश देण्यात आले.**

**निर्णय क्र.६०१** **विषयाचा पाठपुरावा करुन विषय आजचे सभेत सादर करण्यात आलेला असल्याने पुर्वीचा निर्णय कायम करण्यात आला.**

**निर्णय क्र.६०२/४** **तहकुब.**

**निर्णय क्र.६०२/५** **प्रलंबीत. वेळेअभावी तहकुब.**

**निर्णय क्र.६०२** **विषय क्र.०४ ते ४४ बाबतचा निर्णय कायम करण्यात आला.**

**निर्णय क्र.६५०/२** **दि.२२.११.२०२२ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**निर्णय क्र.६०३ ते ६०५ कायम करण्यात आले.**

**निर्णय क्र.६०६** **कायम करण्यात आला. आजचे सभेत प्रस्ताव सादर केला असल्याची माहिती दिली.**

| | |
|---|---|
| निर्णय क्र.६०७ | निर्णय कायम करण्यात आला. पुर्तता करावी. |
| निर्णय क्र.६०८ | निर्णय कायम करण्यात आला. पुर्तता करावी. |
| निर्णय क्र.६०९ | कायम करण्यात आला. |
| निर्णय क्र.६१० | निर्णय कायम करण्यात आला. माहिती पाठविली आहे. विचाराधिन आहे. |
| निर्णय क्र.६११ | निर्णय कायम. माहिती आलेली आहे. विचाराधिन आहे. |
| निर्णय क्र.६१२ व ६१८ | कायम करण्यात आले. |
| निर्णय क्र.६१९ | कायम करण्यात आला. पुर्तता केल्याचे सांगण्यात आले. |
| निर्णय क्र.६२० | कायम करण्यात आला. |
| निर्णय क्र.६२१ | कायम करण्यात आला. विषय प्रलंबीत आहे. |
| निर्णय क्र.६२२ | कायम करण्यात आला. पुर्तता बाकी आहे. |
| निर्णय क्र.६२३ | कायम करण्यात आला.प्रगती अहवाल बाकी आहे. |
| निर्णय क्र.६२४ ते ६२७ | कायम करण्यात आले. |
| निर्णय क्र.६२८ | कायम करण्यात आला. जाहिरात काढल्याची माहिती दिली. |
| निर्णय क्र.६२९ ते ६३० | कायम करण्यात आले. |
| निर्णय क्र.६३१ | कायम करण्यात आला. पुर्तता बाकी आहे. |
| निर्णय क्र.६३२ ते ६४३ | कायम करण्यात आले. |
| निर्णय क्र.६४४ | कायम करण्यात आला. आजचे बैठकीत विषय आहे. |
| निर्णय क्र.६४५ व ६४६ | कायम करण्यात आले. |
| निर्णय क्र.६४७ | कायम करण्यात आला. पुर्तता बाकी आहे.<br>निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. लेखी आदेश झालेला आहे. तेव्हा विनाविलंब २४ तासात पुर्तता करावी व त्याचा अहवाल ४८ तासात तदर्थ समितीचे अध्यक्ष यांना सादर करावा.<br>त्याबाबतची कार्यालयीन टिपणी पाहिल्यानंतर सही खाली तारीख नाही. त्यामुळे निर्देश देण्यात येतो की, कार्यालयीन टिपणीवर सही करतांना आवक व तारीख बाबत शिक्का मारावा. |
| निर्णय क्र.६४८ | कायम करण्यात आला. पुर्तता बाकी आहे. |
| निर्णय क्र.६४९ | कायम करण्यात आला. |

---

विषय नं.२ तुप खरेदीची प्रक्रिया. (सन २०२२-२३ (डीसेंबर-२०२२ ते मार्च-२०२३) अखेर गाईचे शुध्द तुप स्विस चॅलेंज पध्दतीने खरेदी करणेकामीचे निविदेबाबत.)

निर्णय क्र.६५१ १. दि.२७.११.२०२२ रोजी चक्रिय पध्दतीने निर्णयासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जो प्रस्ताव पाठविला होता त्यावर तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी दि.३०.११.२०२२ रोजी अभिप्राय दिले होते. त्यानुसार मसुद्यामध्ये दुरुस्त्या करुन मराठी व इंग्रजी मसुदा सादर केला आहे. संपुर्ण आर्थिक वर्षासाठी प्रथम प्रस्ताव तत्कालीन व्यवस्थापन समितीपुढे ठेवल्यानंतर या आर्थिक वर्षात आतापर्यंत अंदाजे ११.९० कोटी वार्षिक मंजूर रक्कम ३२.९९ कोटी पैकी खर्च झालेला आहे. लाडू बनविण्यासाठी तुप व इतर साहित्य खरेदी करुन बाहय यंत्रणेव्दारे कोटयावधी रुपये पुन्हा खर्च करुन लाडू बनविण्याऐवजी एकुण लाडू बनविण्याचे काम पुर्णपणे बाहययंत्रणेला देणे योग्य होईल काय याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.
२. सुधारीत प्रस्ताव व मसुदा चुकीचा असल्याने चर्चेत ठरल्याप्रमाणे मसुदा कंन्स्लटंट कडून पडताळून घ्यावा व तीन दिवसात प्रस्ताव चक्रिय पध्दतीने तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचेकडे पाठविण्यात यावा.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.३ औषधांच्या खरेदीसाठी प्रक्रिया. (संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलसाठी आवश्यक असणारी औषधे व तदनुषंगीक साहित्य खरेदीबाबतच्या ई-निविदेच्या मसुद्यास मान्यता मिळणेबाबत.)

व

विषय नं.४ किराणा आणि किराणा मालाच्या खरेदीची प्रक्रिया. (सन २०२२-२३ वर्षाकरीता प्रसादालय, कॅन्टीन, मंदिर व लाडूनिर्मिती विभागांसाठी आवश्यक किराणामाल खरेदीबाबत.)

निर्णय क्र.६५२ विषय क्र.३ व ४ चे बाबत- सदरहु प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी न घेता सादर केलेले आहेत. विचारलेवरुन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काहीही सुचना दिलेल्या नाहीत. तदर्थ समितीचे आदेशानुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे स्तरापर्यत प्रस्ताव तपासूण सादर केलेले आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अनुपस्थितीत शासनाकडून अन्य आदेश नसल्यामुळे राज्य शासनाकडून आदेश येईपावेतो व्यवस्थापन समितीने आता आदेश दिले की, संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे तातडीचे कामकाज उप मुख्य

कार्यकारी अधिकारी यांनी पाहावे. त्यानुसार उपरोक्त प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहया नसल्यातरी विचारात घेण्यात येत आहेत.
विषय क्र.४ बाबत निविदा भरतांना निविदाधारकास ब्रॅण्डचा उल्लेख करण्यास सांगावे. उदा.खाद्यतेल. तसेच कडधान्यामध्ये A ग्रेडचा किराणा माल हवा असल्याचा उल्लेख करण्यात यावा.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी, वैद्यकीय संचालक, व प्रशासकीय अधिकारी, खरेदी विभाग यांनी विषय क्र.२-तुप, विषय क्र.३-औषधे व विषय क्र.४-किराणा खरेदीसाठी ई-निविदा मसुदा कन्स्लटंट कडून पडताळणी करुन घ्यावी आणि तीन दिवसात प्रस्ताव चक्रिय पध्दतीने तदर्थ समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचेकडे पाठविण्यात यावा.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.५** लिफ्टच्या CAMC साठी प्रक्रिया. (रुग्णांचे व साईभक्तांचे सुविधेसाठी संस्थानचे सर्व भक्तनिवास, रुग्णालये, श्री साई प्रसादालय येथील लिफ्टचे कॉम्प्रेहेनसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणेकरीता ई-निविदा प्रक्रियेव्दारे प्राप्त झालेले निम्नतम दर मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे फेर सादर.)

**निर्णय क्र.६५३** दर वाजवी असल्याने स्विस चॅलेंज पध्दतीने न जाता टेंडरप्रमाणे प्रस्ताव मंजूर. तीन वर्षाकरीता टेंडर असल्याने व खर्च ५० लाखाचे आत असल्याने सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्याची आवश्यकता नाही.

(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.६** अगरबत्ती इत्यादींच्या विक्रीसाठी श्री साईबाबा समाधीच्या नावाचा दुरुपयोग आणि मंदिर परिसरात अनाधिकृतपणे विक्री केल्याबद्दल सत्य अहवाल आणि/किंवा कारवाईचा अहवाल.

**निर्णय क्र.६५४** दि.३०.१०.२०२१ रोजीचे तदर्थ समितीचे सभेतील निर्णय क्र.२५५ अन्वये ई-निविदा प्रक्रिया राबवून तीन महिन्याचे आत पुर्ण करावी असे आदेश असतांना दि.२२.११.२०२१ ची कार्यालयीन टिपणी ठेवुन दि.१८.०९.२०१७ चे पत्राचा वापर करुन अधिनियमाचे कलम १४ (१ ) मधील नियम उपकलम २ (ग) अनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्णय घेण्याचा जो अधिकार आहे तो अधिकार व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण नियंत्रणाचे अधिन राहून वापरावयाचा आहे. परंतु दि.२२.११.२०२१ चे कार्यालयीन टिपणी व आदेश देऊन जो निर्णय घेतला आहे, सदर निर्णय अधिनियमाचे कलम १४ (१) चे उल्लंघन करुन घेतलेला निर्णय आहे. त्यामुळे

सदर जनसेवा फाऊंडेशन सोबतचा दि.०६.१२.२०२१ रोजीचा करारनामा आहे तो विश्वस्तव्यवस्था व मंदिर प्रशासनावर बंधनकारक नाही. म्हणून सदर संस्थेला त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देणे योग्य राहिल. त्यामुळे जनसेवा फाऊंडेशन बचतगट यांना कारणे दाखवा नोटीस मुख्य कार्यकारी अधिकारी/उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी द्यावी आणि समितीसमोर निर्णयासाठी ठेवावे.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग/बगीचा विभाग)

---

विषय नं.७ समितीच्या सदस्यांनी श्री साईबाबांना शाल व गुरुवार आणि रविवारच्या अर्पण करण्यासाठी मुद्दयांचा पुर्नःविचार करणे. (रविवार, गुरुवार व इतर दिवशी राखीव ठेवलेल्या शॉल्सबाबत दि.०२/११/२०२२ रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०७ निर्णय क्र.५९८ बाबत.)

निर्णय क्र.६५५ दि.१५.१२.२०२२ पासून पुढील आदेश होईपावेतो गुरुवार व रविवार या दिवशी राखीव ठेवलेल्या स्लॉटला देखील ड्रॉ पध्दतीने शॉल टाकण्यात याव्यात.

(कार्यवाही-मंदिर विभाग/ लेखाशाखा विभाग)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने येणारे आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा
विषय नं.१ श्री साईबाबा समाधी मंदिर विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ कडील सुरक्षा घेणेबाबत.

निर्णय क्र.६५६ संस्थानचे संरक्षण विभागाकडे सध्या वेगवेगळया वर्गवारीतील ८७९ कर्मचारी आहेत. ७६ कंत्राटी मिलीटरी सुरक्षा रक्षक (Armed Guard ) ला मंजूरी आहे. मात्र फक्त ३६ Armed Guard कार्यरत आहेत. Armed Guards आर्थिक व्यवहार जेथे हाताळले जातात तेथे वापरण्यात येतात. या व्यतिरिक्त ४४ मिलीटरी रिटायर्ड सुरक्षा रक्षक (जे Armed Guards नाहीत असे) सुरक्षा रक्षक तपासणीसाठी आहेत. सुरक्षा रक्षकांचा सरासरी वयोगट ४५ ते ५० दरम्यान आहे. मिलीटरी रिटायर्ड सुरक्षा रक्षकांचे संस्थानकडील सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१५/२०२० मध्ये दि.२८/११/२०२२ रोजी झालेल्या आदेशाचे अवलोकन केले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार एकुण ७६ बंदुकधारी मंजूर पदसंख्या आहे. परंतु सध्या फक्त ३६ कार्यरत आहेत.

जिल्हा पोलीस अधिक्षक यांचेकडून जो प्रस्ताव आलेला आहे त्यामध्ये ५० बंदुकधारी सुरक्षा कर्मचारी MSF कडून मिळणेबाबत प्रस्ताव मिळालेला आहे. सध्या संस्थानकडून दिलेल्या माहितीनुसार ५० बंदुकधारी सुरक्षा रक्षक यांचे नेमणूकीसाठी वार्षिक अंदाजे २.४० कोटी खर्च येणार आहे.

MSF यांचे सबंधीत अधिका-यास बोलावून घेऊन त्यांना संस्थानचे सुरक्षा व्यवस्थेची प्रत्यक्ष माहिती देऊन मुख्य कार्यकारी अधिकारी/उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेकडून आवश्यक माहिती, कोटेशन, वयोगट, अटी व शर्ती प्रत्यक्ष बोलावून घेऊन अध्यक्ष यांचेकडे पाठवावी.

संस्थानकडे सध्या कंत्राटी पध्दतीने ४० बंदुकधारी सुरक्षा रक्षकांची पदे रिक्त आहेत. पोलीस अधिक्षक यांचा प्रस्ताव ५० बंदुकधारी सुरक्षा रक्षक नेमावे म्हणून आहे. त्यामुळे ३६ बंदुकधारी सुरक्षा रक्षक सध्या कार्यरत आहेत त्या पैकी निवृत्त होतील त्यांचे ऐवजी १० जागा असे एकूण ५० जागा MSF मधुन कंत्राटी पध्दतीने मंदिराचे सुरक्षेसाठी तसेच त्यांचेवर नियंत्रणासाठी एक मुख्य सुरक्षा अधिकारी, आवश्यक संख्येत MSF कडूनच इतर ठिकाणी यांची सेवा घेण्यास अनुकूल अभिप्राय तदर्थ समितीचे अध्यक्ष यांनी मा.उच्च न्यायालयास पाठवावा.

(कार्यवाही-सरंक्षण विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२ श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट सन २०२३-२४ या वर्षासाठी देणेकामी येणा-या खर्चास तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन विविध पध्दतीने ई-निविदा बोलाविणेस मान्यता मिळणेबाबत. (अपेक्षित खर्च रु.४६,००,०००/-)

निर्णय क्र.६५७ मागील निम्नतम दर Base Price धरुन ई-निविदा मागविणेस मंजूरी देण्यात आली. सध्याचा सेवा पुरवठादार, ट्रायडंट, किर्लोस्कर व इतर यांना देखील भाग घेणेबाबत कळविण्यात यावे.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३ शैक्षणिक वर्ष २०२२-२३ इयत्ता १ ली च्या वर्गासाठी शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९(RTE Act-2009) अन्वये इयत्ता १लीचे एकुण १७६ नवीन प्रवेशानुसार २५% प्रमाणे ५९ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६५८  प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल )**

---

**वरील निर्णय क्र.६५० ते  ६५८    सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ७.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.राजेंद्र भोसले,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी अहमदनगर  तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती.**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**